मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२






# महिलांसाठी 'होम मिनिस्टर'स्पर्धा!

## आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त उत्सवमय माहोल; सुवर्णा बुर्डे यांच्या पुढाकाराने उपक्रम यशस्वी

**पिंपरी | प्रतिनिधी**

महिला सबलीकरण आणि भगिनींच्या सन्मानासाठी आयोजित केलेल्या "न्यू होम मिनिस्टर" या भव्य स्पर्धेला चऱ्होली प्रभाग क्रमांक तीन परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पिंपरी-चिंचवडचे आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त वाघेश्वर महाराज घाट, चऱ्होली गावठाण येथे हा कार्यक्रम घेण्यात आला. महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध ग्रहोपयोगी वस्तू बक्षीस स्वरूपात ठेवण्यात आल्या होत्या. परिसरातील महिलांनी उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेविका सुवर्णा विकास बुर्डे पाटील आणि विकास अण्णा हिरामण बुर्डे पाटील यांच्या वतीने करण्यात आले होते. महिलांसाठी खास भरगच्च मनोरंजनासह विविध स्पर्धा आणि "लकी ड्रॉ"चे आयोजन करण्यात आले होते.या लकी ड्रॉमध्ये बक्षिसांची अक्षरशः लयलूट झाली.







प्रथम बक्षीस म्हणून उपस्थित महिलांना स्कूटी (दुचाकी) देण्यात आली, तर इतर आकर्षक बक्षिसांमध्ये 32 इंचांचे एलईडी टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन, स्मार्टफोन, मायक्रोओव्हन आणि एअर फ्रायर यांचा समावेश होता. याशिवाय शेकडो महिलांना भेटवस्तू देऊन कार्यक्रमाला सोनेरी कळस चढवण्यात आला.महिला सक्षमीकरणाच्या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून आयोजित या उपक्रमाने चऱ्होलीसह आसपासच्या परिसरातील महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रम स्थळी हसरा, आनंदी आणि उत्सवी माहोल दिसून आला.

> जनसेवा ही रक्तात असावी लागते. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याप्रमाणे १८ पगड जाती धर्मासाठी लागणारे समर्पण, कुटुंब, आर्थिक परिस्थितीचे तुमच्यासारख्या शेतकरी कुटुंबाला आहे. जे काही महिला भगिनींसाठी काम करता येईल ते करायचा आहे. या कार्यात जनतेचे साथ लाभेल. असा विश्वास आहे. यापुढेही असेच कार्य आमच्या हातून घडेल असा शब्द आहे.
>
> **- सुवर्णा बुर्डे,**
> **मा. नगरसेविका.**

# होम मिनिस्टर स्पर्धेत हजारो महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

## कलागुणांना मिळाला वेध: कविताताई भोंगाळे पाटील यांचा उपक्रम, मोठ्या संख्येने महिला उपस्थित

**पिंपरी | प्रतिनिधी**

आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कविताताई भोंगाळे पाटील यांच्या वतीने होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रभाग क्रमांक पाचमधील महिलांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. मोठ्या संख्येने महिला उपस्थित राहून विविध खेळांच्या माध्यमातून स्पर्धेचा आनंद लुटला.

दैनंदिन कामाच्या व्यापातून स्त्रियांना विरंगुळा मिळाल्याने परिसरात आनंदमय वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमात विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे देऊन त्यांचे मनोबल वाढवण्यात आले. स्पर्धेच्या निमित्ताने महिलांना व्यासपीठावर स्वतःची कला सादर करण्याची आणि आत्मविश्वास वृद्धीची संधी मिळाली.





या वेळी सचिन भैय्या लांडगे, सागर गवळी, कार्तिक लांडगे, प्रदीप पवार, अमोल डोळस, मयूर विखे, मल्हार महेश लांडगे, विजय भोसुरे, उमेश उगले, हरिभाऊ तांदळे, ज्ञानेश्वर चव्हाण, ओंकार काटोले, प्रवीण ढोरे, सोनाली गव्हाणे, कविता गव्हाणे, स्वाती पोटवडे, माई गवळी, रोहिणी मांढरे, गायत्री तळेकर, स्वाती शिर्के , मनिषा गंगने आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना कार्तिक लांडगे म्हणाले, "विदर्भाची कन्या आणि भोसरीची सुपुत्री असणारी माझी ताई आज आपल्या प्रभागाचा विकास करण्याच्या उद्देशाने पुढे येत आहे तिच्या पाठीमागे आपण सर्वजण खंबीरपणे उभे रहा. इथले वीज, पाणी, रस्ते यांसह जे काही प्रश्न असतील ते ती सक्षमतेने सोडवेल, याची आम्हाला खात्री आहे."

> भोसरी विधानसभेचे दमदार आमदार महेश दादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग पाच मधील महिलांना त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, त्यांचे मनोरंजन व्हावे या हेतून होम मिनिस्टर हा कार्यक्रम घेण्यात आला. त्यामध्ये महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या प्रमाणात बक्षीसे ठेवण्यात आली. महिला सक्षमीकरणासह, महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा हा आपला हेतू या उपक्रमातून पूर्णत्वास नेला. यापुढेही प्रभागातील अबालवृध्दांसाठी कार्यरत राहून चांगले काम करणार आहे.
>
> **- कविता भोंगाळे पाटील, चिटणीस भाजपा**
> **पिंपरी-चिंचवड शहर.**


समस्येचा मूळ शोधून
ताबडतोब उपाय शोधणारा कार्यक्षम
आमदार
महेशदादा
लांडगे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!!
श्री. उदय दत्तात्रय गायकवाड
सामाजिक कार्यकर्ते


आमदार
महेशदादा
लांडगे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!!
सौ. कविताताई भोंगाळे (पाटील)
चिटणीस, भाजपा पिंपरी चिंचवड जिल्हा कार्यकारिणी
संस्थापक अध्यक्षा, गायत्री सखी मंच
संचालिका, स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे

# मतदारयाद्यांतील गोंधळामुळे त्रासले इच्छुक उमेदवार

## एकूण 419 हरकती, याद्यांच्या विक्रीतून महापालिकेला 13 लाख रुपयांचे उत्पन्न

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभागरचना जाहीर झाल्यानंतर प्रभागाच्या प्रारुप मतदारयाद्या निवडणूक विभागाने जाहीर केल्या आहेत. परंतु या याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गोंधळ असल्यामुळे इच्छुक उमेदवार त्रासले आहेत.

मतदारांना त्यांचे नाव शोधण्यास अडचणींचा सामना करावा लागत आहे. या मतदार याद्यांमध्ये घोळ असल्याची प्रशासनाने कबुली दिली आहे. त्यामुळे मतदार याद्यांवरील घेतलेल्या हरकतींची दखल घेवून त्या सोडविल्या जातील, असा विश्वास महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिला आहे. दरम्यान, इच्छुक उमेदवार तसेच महाविकास आघाडीकडून महापालिकेच्या निवडणूक विभागाच्या कारभारावर संताप व्यक्त केला जाऊ लागला आहे.

दरम्यान, प्रारुप मतदारयाद्या जाहीर झाल्यापासून आतापर्यंत एकूण ४१९ हरकती नोंदविण्यात आल्या आहेत. तर मतदारयाद्यांच्या विक्रीतून १३ लाख ३० हजार २७९ रुपयांचे उत्पन्न महापालिकेला प्राप्त झाले आहे. महापालिकेच्या निवडणूक विभागातील अधिकाऱ्यांनी तसेच सहायक आयुक्तांनी प्रभागात फिरुन मतदारांची नावे यादी समाविष्ट करणे अपेक्षित होते. परंतु तसे न झाल्यामुळे एका प्रभागातील नावे दुसऱ्या प्रभागात गेली आहेत. तर महापालिकेच्या आरोग्य निरीक्षक आणि मुकादमाला हाताशी धरुन माजी नगरसेवकांसह राजकारण्यांनी मतदारांची नावे आपल्या सोयीनुसार पळविले असल्याचा आरोप केला जात आहे. या आरोपांची चौकशी केली जाईल, असे निवडणूक विभागाकडून सांगितले जात आहे.



प्रारूप मतदारयादीवर गुरुवारपर्यंत (दि. २७) हरकती आणि सूचना दाखल करता येतील. हरकतींचा विचार करून ५ डिसेंबर रोजी अंतिम यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर, ८ डिसेंबरपर्यंत मतदान केंद्रे अंतिम केली जातील आणि १२ डिसेंबर रोजी अंतिम मतदान केंद्रनिहाय मतदार यादी जाहीर केली जाईल. महापालिका आयुक्त कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत आयुक्त नवलकिशोर राम यांनी प्रारूप मतदारयादी जाहीर केली.

त्यानुसार, आगामी महापालिका निवडणुकीत ४१ प्रभागांमध्ये एकूण ३५ लाख ५१ हजार ४६९ मतदार असतील. प्रभाग ९ मध्ये (सुस-बाणेर-पाषाण) सर्वाधिक १,६०,२४२ मतदार आहेत. त्यानंतर प्रभाग ३८ मध्ये (बालाजीनगर-आंबेगाव-कात्रज) १,४८,७६९ मतदार आहेत. प्रभाग ३८ हा शहरातील एकमेव पाच सदस्यांचा प्रभाग आहे. प्रभाग ३९ मध्ये (अप्पर सुपर इंदिरानगर) मध्ये ६०,२०५ इतके सर्वात कमी मतदार आहेत. प्रभाग २० मध्ये (शंकर महाराज मठ-बिबवेवाडी) सर्वात कमी मतदारांची संख्या फक्त ६५,०६१ आहे.

### आरक्षणासंदर्भात 24 हरकती

» प्रभागात टाकण्यात आलेल्या आरक्षणाविषयी हरकती नोंदविण्यासाठी सोमवारपर्यंत (दि. २४) मुदत होती. निवडणूक कार्यालयाकडे २४ हरकती प्राप्त झाल्या असून, यामध्ये प्रभाग क्रमांक एकमध्ये सर्वात जास्त सहा हरकती आल्या आहेत. या प्रभागातील एका गटात अनुसूचित जातीच्या महिलांसाठी आरक्षण टाकले आहे. ते आरक्षण पुरुषांसाठी बदलावे, अशी हरकत नोंदविली गेली आहे. प्रभाग क्रमांक नऊमध्ये दोन हरकती आल्या आहेत. या ठिकाणी अनुसुचित जातीच्या मतदारांची संख्या दुप्पट झाली आहे. यामुळे येथे ते आरक्षण देणे आवश्यक असल्याचे हरकतीत नमूद केले आहे.

### मतदारयादीत 3 लाख 468 डुप्लिकेट मतदार

» याप्रसंगी, महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले की, शहरात एकूण ३ लाख ४६८ डुप्लिकेट मतदार आढळले आहेत. त्यांची चौकशी सुरू आहे. त्यांनी नागरिकांना प्रारूप यादीतील त्यांचे नाव, पत्ता, मतदार क्रमांक आणि प्रभागाची माहिती काळजीपूर्वक तपासण्याचे आवाहन केले. जर काही त्रुटी आढळल्या तर त्यांनी तत्काळ दुरुस्ती अर्ज सादर करावा जेणेकरून अंतिम मतदारयादी अचूक असेल आणि कोणत्याही अडचणीशिवाय मतदानाचा अधिकार बजावता येईल.

# भव्य 'फुल पीच डे-नाईट' टेनिस स्पर्धेला उत्साहाचा प्रतिसाद!

## महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त गणेश सस्ते यांचा स्तुत्य उपक्रम; 80 संघांचा विक्रमी सहभाग

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोबाईल आणि डिजिटल युगातील तरुणाईला मैदानावर उतरवून क्रीडा संस्कृतीला चालना देण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड येथे आयोजित केलेल्या 'फुल पीच डे-नाईट भव्य टेनिस स्पर्धे'ला प्रचंड आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्थानिक खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शिवयोद्धा ग्रुप चे संस्थापक अध्यक्ष गणेश सस्ते यांच्या पुढाकाराने ही स्पर्धा महेश दादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त सिटी स्पोर्ट्स ग्राउंड येथे आयोजित करण्यात आली होती.



या पाच दिवसीय स्पर्धेत एकूण ८० संघांनी सहभाग नोंदवत विक्रमी उपस्थिती दर्शवली. सर्व सामन्यांमध्ये खेळाडूंची जिद्द, कला आणि कौशल्ये यांचा कस लागला, ज्यामुळे अनेक रोमांचक आणि चुरशीच्या लढती क्रीडाप्रेमींना पाहायला मिळाल्या.

**रोमांचक अंतिम फेरीत विजेत्यांची घोषणा:**

अंतिम फेरीत किंग्स बेरी सोसायटी चऱ्होली आणि आस्था सोसायटी चऱ्होली यांच्यात जबरदस्त झुंज झाली. स्पर्धेत एकूण पाच क्रमांकांसाठी रोख बक्षिसे जाहीर करण्यात आली होती, ज्यामुळे खेळाडूंचा उत्साह द्विगुणित झाला होता.

**आरोग्यदायी जीवनशैलीसाठी स्पर्धांचे आयोजन**

या स्पर्धेच्या आयोजनामागे तरुणांनी मैदानी खेळांत सक्रिय सहभाग घेऊन आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारावी, हा मुख्य हेतू होता.

आयोजक गणेश सस्ते यांनी यावेळी बोलताना सांगितले की, "अशा स्पर्धांमुळे स्थानिक खेळाडूंना आपली कला आणि जिद्द दाखवण्याची एक मोठी संधी मिळते. क्रीडा क्षेत्रात नव्या पिढीला प्रोत्साहन देण्यासाठी भविष्यात अशा आणखी स्पर्धांचे आयोजन करण्याचा मानस आहे."

या शानदार 'डे-नाईट' टेनिस स्पर्धेत खेळाडूंसह प्रेक्षकांचाही उत्स्फूर्त सहभाग दिसून आला, ज्यामुळे हा क्रीडा उपक्रम यशस्वी ठरला.

### स्पर्धेतील रोख बक्षिसे आणि मानकरी:

- » प्रथम ५१,००० रुपये किंग्स बेरी सोसायटी चऱ्होली
- » द्वितीय ४१,००० रुपये आस्था सोसायटी चऱ्होली
- » तृतीय ३१,००० रुपये मंगलम सोसायटी, डुडुळगाव
- » चतुर्थ २१,००० रुपये हेक्सा सोसायटी, डुडुळगाव
- » पाचवा ११,००० रुपये पलाश 24 सोसायटी, मोशी






समस्येचा मूळ शोधून
ताबडतोब उपाय शोधणारा कार्यक्षम
आमदार
महेशदादा
लांडगे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!!
सौ. नम्रता योगेश लोंढे नगरसेविका पिं.चिं. मनपा


समस्येचा मूळ शोधून
ताबडतोब उपाय शोधणारा कार्यक्षम
आमदार
महेशदादा
लांडगे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!!
श्री. सागर (भैय्या) गवळी नगरसेवक पिं.चिं. मनपा

# भोसरीतील हिंदुभूषण क्रीडा महोत्सवात विविध स्पर्धांचा उत्साह

## आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त हिंदुभूषण क्रीडा महोत्सव 2025







**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभेचे आमदार, हिंदुत्ववादी व क्रीडाप्रेमी नेते मा. पै. महेशदादा किसनराव लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त हिंदुभूषण क्रीडा महोत्सव 2025 मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने मुलांसाठी पोल मल्लखांब, मुलींसाठी रोप मल्लखांब तसेच वृक्षारोपण व प्रभाग क्रमांक ३ मधील शालेय साहित्याचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन अण्णासाहेब मगर सहकारी बँक लि. भोसरीचे मा चेअरमन विद्यमान संचालक तसेच वेदिक व्हिस्डम एज्युकेशनल ट्रस्ट मोशीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. राजेश दत्तात्रय सस्ते यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते.

यावेळी जय मल्हार सुवर्णसंचय योजनेच्या अध्यक्षा सौ. अर्चनाताई राजेश सस्ते यांचीही उपस्थिती होती. वेदिक विस्डम इंटरनॅशनल स्कूल, मोशी (इंद्रायणी पार्क शेजारी) येथे हा कार्यक्रम पार पडला.

या प्रसंगी महापौर राहुलदादा जाधव, कार्तिक लांडगे, अण्णासाहेब मगर बँकेचे चेअरमन नंदकुमार लांडे, संचालक रामदास काळजे, संतोष भांगरे, नगरसेविका सारिका बोऱ्हाडे, सोनम जांभुळकर, निखिल बोऱ्हाडे, निलेश बोराटे, रमेश वाहिले, योगेश तळेकर, सचिन तळेकर, दत्तात्रय मोकाशी, विजय सस्ते, अजित सस्ते, वंदना आल्हाट, नितीन लांडगे, युवराज लांडे व रवींद्र गायकवाड तसेच संस्थेचे पदाधिकारी सचिन सस्ते आशिष सस्ते चेतन सस्ते प्रवीण सस्ते आदी मान्यवर उपस्थित होते.महोत्सवात विद्यार्थ्यांनी क्रीडाप्रेम, शिस्त आणि संघभावना दाखवून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमानंतर विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कमेची पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.प्रशस्तीपत्रक व ट्रॉफी मेडल खेळाडूंना देण्यात आले.

# वाळद व मांदळेवाडी परिसरात बिबट्याचा वाढता वावर

## वन विभागाने पिंजरे वाढवण्याची तयारी; शेतकऱ्यांनी केली सुरक्षेची मागणी



**पुणे | प्रतिनिधी**

वाळद (ता. खेड) येथील पुशपालक रामदास नामदेव पोखरकर यांच्या दुभत्या जर्सी गायीवर बिबट्याने हल्ला केल्याने या गायीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. यामध्ये शेतकरी पोखरकर यांचे अंदाजे 1 लाख 25 हजारांचे नुकसान झाले.

वाळद व परिसरात बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढलेला असून, आजतागत अनेक पाळीव जनावरांसह भटक्या कुत्र्यांच्या बिबट्याने जीव घेतलेला आहे. दि. 6 नोव्हेंबर रोजी वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात पूर्ण वाढ झालेली 10 वर्षांची बिबट मादी जेरबंद झाली होती; मात्र या भागात अजूनही बिबटे असल्याने वन विभागाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा देऊन खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. येथे पिंजऱ्यांची संख्या वाढवण्याची मागणी केली जात आहे.

मागील 7 नोव्हेंबर रोजी रामदास पोखरकर यांच्या 5 वर्ष वयाच्या जर्सी गायीवर बिबट्याने हल्ला करून या गायीला गंभीर जखमी केले होते. वाडा येथील पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रेरणा मुळूक यांच्या माध्यमातून संबधित गायीवर उपचार सुरू होते; मात्र शनिवारी (दि. 22) या गायीचा मृत्यू झाला. वन विभागाने या भागात पिंजरे लावले असते, तर या शेतकऱ्याचे झालेले नुकसान टाळता आले असते, असे पशुपालक रामदास पोखरकर यांनी सांगितले.

या घटनेचा वनपरिमंडल अधिकारी डी. डी. फापाळे, वनरक्षक एस. वाय. आंबेकर, वनसेवक एस. एस. मुऱ्हे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. संबंधित शेतकऱ्याला वन विभागाच्या वतीने भरपाई मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### उंच चाऱ्यामुळे जनावरे मोकाट; धोका वाढला

यंदा पावसाची दमदार हजेरी झाल्याने परिसरातील डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणात चारा उपलब्ध झाला आहे. त्यामुळे शेतकरी शेळ्या, मेंढ्या व जनावरे मोकाट चरायला नेत आहेत. मात्र बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे शेतकरी भयभीत झाले असून 'जनावरांचे रक्षण करायचे की स्वतःचे?' असा प्रश्न निर्माण झाल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करतात. भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याची ऊसतोड सुरू झाल्याने बिबट्यांची दडण कमी होईल आणि तो डोंगरातील झाडा-झुडपांत स्थलांतर करू शकतो, असे स्थानिक सांगत आहेत.

### सावधगिरीचे आवाहन

शेतात काम करताना तसेच जनावरे चरायला नेताना सावधगिरी बाळगावी, असे आवाहन वन विभागाने केले आहे. झिंझळ डोंगर परिसरात पिंजरा बसवण्याची मागणी संतोष शिंदे (चेअरमन, विविध सहकारी सोसायटी), महादू बोत्रे, अजय बोत्रे व स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. तर वन विभागाशी संपर्क साधला असता, 2 दिवसांत अतिरिक्त पिंजरा बसवण्यात येईल, अशी माहिती देण्यात आली.

### डेरे येथे बिबट्याची दहशत

» भाटघर धरणाच्या बॅक वॉटर जवळील डेरे येथील इनामाच्या ओढ्याजवळ बिबट्या पाहिल्याचे शेतकरी जयवंत डोंबे यांनी सांगितले. जयवंत डोंबे हे रविवारी (दि. 23) सायंकाळी साडेसातच्या सुमारास भात काढणीचे काम करून पुण्याच्या दिशेने जात होते. त्यावेळी त्यांना बिबट्या दिसला. बिबट्याने चारचाकी वाहनाला धडक दिल्याचे डोंबे यांनी सांगितले. या भागात बिबट्याचा वावर वाढत असल्याने भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे वन विभागाने तत्काळ बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शरद डोंबे यांनी केली आहे.


समस्येचा मूळ शोधून
ताबडतोब उपाय शोधणारा कार्यक्षम
आमदार महेशदादा लांडगे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!!
श्री. सचिनभाऊ तापकीर कोषाध्यक्ष, पिं. चिं. भाजप


समस्येचा मूळ शोधून
ताबडतोब उपाय शोधणारा कार्यक्षम
आमदार महेशदादा लांडगे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!!
श्री. निलेश मधुकर नेवाळे सामाजिक कार्यकर्ते


देव-देश अन् धर्माभिमानी प्रखर
हिंदुत्ववादी ''शिव-शंभू भक्त''
आमदार
महेशदादा
लांडगे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!!
श्री. विकास हरिश्चंद्र डोळस मा. नगरसेवक पि. चिं. मनपा


पिंपरी-चिंचवडच्या शाश्वत
विकासाचा प्रणेता
आमदार
महेशदादा
लांडगे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!!
सौ. सुवर्णाताई विकास बुर्डे (स्थायी समिती सदस्या,
नगरसेविका पिं.चिं. मनपा)


समस्येचा मूळ शोधून
ताबडतोब उपाय शोधणारा कार्यक्षम
आमदार
महेशदादा
लांडगे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!!
श्री. निखिल शिवाजी बोऱ्हाडे
युवा नेते,
भारतीय जनता पार्टी


विकासाभिमूख हिंदूत्वाचे पुरस्कर्ते
आमदार
महेशदादा
लांडगे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!!
श्री. सुरेश (तात्या) म्हेत्रे
मा. नगरसेवक पि. चिं. मनपा


पिंपरी-चिंचवडच्या शाश्वत विकासाचा
प्रणेता
आमदार
महेशदादा लांडगे
आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत
शुभेच्छा...
सौ. अस्मिताताई अनिल भालेकर
(खजिनदार, महिला मोर्चा पिं.चिं. शहर भा.ज.पा.)
श्री. अनिलशेठ महादु भालेकर
(चेअरमन, शिवभक्त नागरी पतसंस्था आकुर्डी)


पिंपरी-चिंचवडच्या शाश्वत विकासाचा
प्रणेता
आमदार
महेशदादा लांडगे
आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत
शुभेच्छा...
सौ. कावेरी सचिन तळेकर
सामाजिक कार्यकर्त्या
श्री. सचिन भाऊ तळेकर
सामाजिक कार्यकर्ते


27 NOV
दमदार आमदार
महेश दादा लांडगे
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...!
प्रा.राजेशभाऊ दत्तात्रय सस्ते
मा.चेअरमन अण्णासाहेब मगर सहकारी बँक मर्यादित भोसरी
संस्थापक अध्यक्ष-वैदिक विजडम् एज्युकेशनल ट्रस्ट मोशी
सौ.अर्चनाताई राजेश सस्ते
अध्यक्ष-जय मल्हार सुवर्ण संचय योजना


मेट्रो सिटी पिंपरी-चिंचवडचा संकल्पक
आमदार
महेशदादा लांडगे
आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत
शुभेच्छा...
श्री. रमेश सोपानराव वहिले
उपाध्यक्ष- भाजपा पिंपरी चिंचवड शहर
सौ. सुरेखाताई रमेशशेठ वहिले
सामाजिक कार्यकर्त्या


धर्मवीर छत्रपती
संभाजी महाराजांचे
जगातील सर्वात उंच स्मारक
STATUE OF
हिंदभूषण
शंभूराजांचे विचार घरोघरी
पोहोचवण्याचा संकल्प
शिव-शंभू विचारांनी प्रेरीत
तरुण घडण्याचा निर्धार
आमदार
२७ नोव्हेंबर
महेशदादा
लांडगे
आपणांस वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा.!
धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे जगातील सर्वांत उंच "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" हे फक्त भव्य शिल्प नाही, तर आपल्या इतिहासातील अदम्य शौर्य, धर्मनिष्ठा आणि हिंदवी अभिमानाचे उंच शिखर आहे. शंभूराजांच्या विचारांना घराघरांत पोहोचवण्याचा आमचा संकल्प म्हणजे प्रत्येक कुटुंबात स्वत्व, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठेची ज्योत प्रज्वलित करणं. शिव-शंभू विचारांनी प्रेरित झालेली आणि राष्ट्रासाठी जगण्याची शपथ घेतलेली तरुणाई घडवण्याचा आमचा निर्धार कायम आहे
- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.
SCAN QR
सौ. सारिका नितीन बोऱ्हाडे
मा. नगरसेविका, पिं.चिं.मनपा.
श्री. नितीन वसंत बोऱ्हाडे
सामाजिक कार्यकर्ते
शुभेच्छुक - प्रभाग क्र.2 कुदळवाडी-जाधववाडी-बोऱ्हाडेवाडी मधील सर्व नागरिक


"मेट्रो सिटी
पिंपरी-चिंचवडचा
संकल्पक"
आमदार
महेशदादा
लांडगे
आपणांस उदंड
आयुष्याच्या अनंत
शुभेच्छा
श्री.शरद गोपाळतात्या भालेकर
उपाध्यक्ष भारतीय जनता युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहर
सौ. नेहा शरद भालेकर
सामाजिक कार्यकर्त्या


शेत-माती-संस्कृतीचा उपासक...
विकासाभिमूख हिंदुत्वाचे पुरस्कर्ते
पैलवान
आमदार
महेशदादा
लांडगे
आपणांस उदंड
आयुष्याच्या अनंत
शुभेच्छा
श्री. योगेश बबन तळेकर
अध्यक्ष - टाटा मोटर्स एम्प्लॉइज युनियन कार प्लांट
सौ. सरिता योगेश तळेकर
सामाजिक कार्यकर्त्या


शेत-माती-संस्कृतीचा उपासक...
विकासाभिमूख हिंदुत्वाचे पुरस्कर्ते
पैलवान
आमदार
मा.श्री.
महेशदादा
लांडगे
औक्षवंत व्हा..!
शांताराम को. भालेकर
(एस. के. बापू)
मा. नगरसेवक
पिं. चिं. मनपा.

# पिंपरी-चिंचवडमध्ये महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त डे-नाईट क्रिकेट स्पर्धा

## सागर भाऊ थोरात यांच्या पुढाकारातून पिंपरी-चिंचवडमध्ये स्पर्धांचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचे हिंदुत्ववादी आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्र. ११ मध्ये भव्य 'हाफपीच डे-नाईट क्रिकेट स्पर्धा' (सोसायटी प्रीमियर लीग) आयोजित करण्यात आली होती.

शहरातील सर्वात मोठी क्रिकेट स्पर्धा म्हणून याकडे पाहिले गेले. स्वामी विवेकानंद क्रीडांगण, शगुन हॉस्पिटलसमोर, फुलेनगर येथे ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेसाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला होता.




युवा नेते सागरभाऊ थोरात आणि चांगभल प्रतिष्ठान यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एकूण २८ संघ यामध्ये सहभागी झाले. प्रथम बक्षीस रु. १५,०००/-, द्वितीय बक्षीस रु. ११,०००/-, तृतीय बक्षीस रु. ७,०००/- आणि चौथे बक्षीस रु. ५,०००/- इतके होते. याव्यतिरिक्त, स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूला 'मॅन ऑफ द सिरीज' साठी सायकल (BICYCLE) असे विशेष बक्षीस देण्यात आली. तसेच सहभागी प्रत्येक संघाला आकर्षक चषक देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती.

या क्रिकेट स्पर्धेचे थेट प्रक्षेपण (LIVE STREAM) YOUTUBE वर दाखविण्यात आले. क्रिकेटप्रेमींनी आणि नागरिकांनी या स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित अशा प्रकारच्या क्रीडा स्पर्धांमुळे तरुणांना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी एक मोठे व्यासपीठ उपलब्ध होते.

> “ या स्पर्धेला प्रभाग क्रमांक 11 मध्ये खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी अनेक खेळाडूंनी मागणी केली की दरवर्षी देखील अशी स्पर्धा व्हावी. की इथून पुढे देखील या स्पर्धा होतील अशी आम्ही ग्वाही दिली.”
>
> **- सागर भाऊ थोरात**




